## <u>भारताबाहेरील निकटच्या नातेवाईकांकडून मिळालेल्या कर्जांचे उदारीकरण</u>
**सप्टेंबर ६, २००२**

भारतीय रिझर्व्ह बँक, निवासी भारतीयांच्या परकीय चलन व्यवहारांसंबंधीच्या प्रचलित नियमांसंबंधीच्या कार्यपद्धतीचे सरलीकरण व उदारीकरण करण्याच्या दृष्टीने पावले उचलत आहे.
प्रचलित नियमांनुसार, निवासी भारतीयांना, त्यांच्या भारताबाहेर रहात असलेल्या निकटच्या नातेवाईकांकडून जास्तीत जास्त २,५०,००० अमेरिकन डॉलर पर्यंत कर्जे घेण्याची सर्वसाधारण परवानगी आहे, मात्र असे कर्ज, विना व्याज असावयास हवे व ते सात वर्षांच्या आत परत करण्यायोग्य असू नये. रिझर्व्ह बँकेकडे आलेल्या निवेदनांचा विचार करुन असे ठरवण्यात आले आहे की अशा कर्जांच्या परतफेडीचा किमान कालावधी एक वर्षापर्यंत कमी करण्यात यावा. त्यानुसार, आता जर कर्ज विना व्याज असेल व एक वर्षानंतर परतफेडयोग्य असेल, तर निवासी व्यक्ती त्यांच्या भारताबाहेर राहत असलेल्या निकटच्या नातेवाईकांकडून जास्तीत जास्त २,५०,००० अमेरिकन डॉलरपर्यंत कर्ज घेऊ शकतील.
परकीय चलन व्यवस्थापन कायदा १९९९ (फेमा) अंतर्गत प्रचलित नियमांमधील बदल करण्याची अधिसूचना जारी करेपर्यंत रिझर्व्ह बँकेची प्रादेशिक कार्यालये या संबंधीच्या आलेल्या अर्जांची सत्वर कार्यावाही करतील.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३/२६६**